राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ

'' (सेंट्रल प्रोव्हिन्सेस शासन शिक्षण विभागाची अधिसूचना क्रमांक ५१३ दिनांक १ ऑगस्ट, १९२३ द्वारा स्थापित व महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम,२०१६(सन २०१७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ६)द्वारा संचालित राज्य विद्यापीठ)''

(विद्या विभाग)

छत्रपती शिवाजी महाराज प्रशासकीय परिसर, रविन्द्रनाथ टागोर मार्ग, नागपूर – ४४० ००१.

दूरध्वनी क्रमांक: कार्यालय: ०७१२–२५३२०६३ फॅक्स : ०७१२–२५५५७०१

क्र. रातुमनावि/विद्या/१७/२०८ दिनांक ३१ ऑगस्ट, २०१७

# : अधिसूचना :

सर्व संबंधितांना सूचित करण्यात येते की, महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ अंतर्गत विद्यापीठात राबविण्यात येणाऱ्या चारही विद्याशाखेतील परिक्षेच्या कामात एकसुत्रता राहण्याकरिता निर्देश क्रमांक १३/२०१७ निर्गमित करण्यात आलेला आहे. सदर निर्देशान्वये मानव्यशास्त्र विद्याशाखे अंतर्गत येणाऱ्या बी.ए. भाग १,२ व ३ (1 to 6 semester) पदवी अभ्यासक्रमातील सत्र पध्दतीकरिता विद्यापठाच्या प्रारूप निर्देश समितीने दिनांक २२/०८/२०१७ रोजी प्रारूप निर्देश तयार करून दिले होते. यास दिनांक २९/०८/२०१७ रोजी अधिष्ठाता मंडळाने मान्यता प्रदान करून योग्य कार्यवाहीस्तव मा. कुलगुरू महोदयांना शिफारशीत केले होते. त्याअनुषंगाणे मा. कुलगुरू महोदयांनी महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ च्या कलम १२ (७) अंतर्गत संबधीत अभ्यासमंडळे, मानव्यशास्त्र विद्याशाखा, विद्वत परिषद व व्यवस्थापन परिषदेच्या वतिने मान्यता प्रदान केलेली आहे.

उपरोक्त मान्यतेनुसार **निर्देश क्रमांक २७/२०१७ B.A. भाग १,२ व ३ (1 to 6 Semester) पदवी अभ्यासक्रमाच्या सत्र पध्दतीकरिता सत्र २०१७–२०१८ पासुन पुढे लागू करण्यात येत आहे**. सदर निर्देशास मा. कुलगुरू महोदयांनी कार्यान्वीत करण्याकरिता महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ कायदा २०१६ च्या कलम १२(८) अंतर्गत दिनांक ३१ ऑगस्ट, २०१७ रोजी विद्वत परिषद व व्यवस्थापन परिषदेच्या वतिने मान्यता प्रदान केलेली आहे. करिता हा निर्देश निर्गमित करण्यात येत असून या प्रमाणे सबंधीतांनी कार्यवाही घ्यावी ही विनंती.

(टिप:– उपरोक्त निर्देश विद्यापीठाच्या **www.nagpuruniversity.org** या संकेत स्थळावर उपलब्ध करण्यात आला आहे.)

मा.कुलगुरूंच्या आदेशानुसार

(पुरणचंद्र मेश्राम)
कुलसचिव